# प्रेसनोट

दि. ०४/१०/२०२३

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गणेश खिंड अर्बन टेस्टिंग डिव्हीजन, चिंचवड, पुणे येथील कार्यकारी अभियंता यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | चिंचवड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, गु.र.नं. ४७४/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३८ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. राजेंद्रकुमार साळुंखे, कार्यकारी अभियंता (वर्ग-१),एम.एस.ई.डी.एल. गणेश खिंड अर्बन, टेस्टिंग डिव्हीजन कार्यालय, चिंचवड गांव, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १०,०००/- रुपये |

पडताळणी दिनांक :- २३/०८/२०२३.

गुन्हा दाखल दिनांक :- ०४/१०/२०२३.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सोलर सिस्टिमचे ठेकेदार असून, ते बसवून देणेकरीता ग्राहक व एम.एस.ई.डी.एल. (महावितरण) यांचेमध्ये लायझनिंगचे काम करतात. तक्रारदार यानी ग्राहकाचे घरी सोलर सिस्टीम इन्स्टॉलेशनचे कामाची एन.ओ.सी. / तपासणी अहवाल मिळणेकरीता महावितरण कार्यालयात ऑनलाईन अर्ज करून, त्याचा पाठपुरावा तक्रारदार स्वतः करीत होते. लोकसेवक राजेंद्रकुमार साळुंखे, कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे सदरची एन.ओ.सी. व मीटर टेस्टींगसाठी १०,०००/- रुपये लाच रक्कम मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक राजेंद्रकुमार साळुंखे, कार्यकारी अभियंता यांनी सोलर सिस्टीम इन्स्टॉलेशनची एन.ओ.सी. व मीटर टेस्टींगसाठी म्हणुन स्वतःसाठी तसेच कार्यालयातील संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक सुदाम पाचोरकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.